स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

# “दाखल्यांची शाळा”

-: संकल्पना आणि आयोजन :-

जे. डी. बंगाळे
मंडळ अधिकारी,खिरोदा प्र.यावल,
ता.रावेर,जि.जळगांव

# “दाखल्यांची शाळा” संकल्पनेचा उगम...

शैक्षणिक जीवनातील प्रवेश प्रक्रिया,शिष्यवृत्ती,नोकरी इत्यादी बाबींकरीता विविध प्रकारच्या प्रमाणपत्रांचे/दाखल्यांचे महत्व अनन्य साधारण आहे. शासन निर्णयानुसार जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र इत्यादी शैक्षणिक प्रमाणपत्र/दाखले महसूल विभागाकडून वितरीत केले जातात.पालक,विद्यार्थी वर्षभर आपले सरकार केंद्रामार्फत अथवा स्वत: अर्ज करून या दाखल्यांची मागणी Online पद्धतीने करू शकतात व महसूल विभागातील अधिकारी,कर्मचारी संपूर्ण वर्षभर दाखल्यांचे वितरण करत असतात.

वर्षभर दाखले वितरणाची सुविधा असतानाही बहुतांश वेळा जून-जुलै महिन्यात इयत्ता १० वी व १२ वी चे निकाल लागल्यानंतरच प्रवेश प्रक्रियेच्या वेळी विद्यार्थी, पालक यांची दाखले काढण्यासाठी धावपळ सुरु होते.विशेषत: ग्रामीण भागात तर हा काळ शेतकरी पालकांच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असतो कारण शेतीच्या मशागतीचे व पेरणीचे कामही याच काळात सुरु झालेले असतात. नेमके याच वेळी आवश्यक तो दाखला काढण्यासाठी विद्यार्थी व पालक यांना तहसील कार्यालयात यावे लागते.

काही वेळा पालक एखाद्या मध्यस्थ व्यक्तीला दाखले काढण्याचे काम देतात व यात त्यांची आर्थिक पिळवणूकही होते. कारण हे मध्यस्थ व्यक्ती विद्यार्थी पालक यांच्या कडून दाखल्यांच्या शासकीय शुल्कापेक्षा जास्त रक्कम घेतात. प्रवेश प्रक्रिया अगदी तोंडावर असल्याने एकाच वेळी मोठ्याप्रमाणावर अर्ज दाखल करण्यासाठी प्रयत्न सुरु असतात. प्रणालीत विविध प्रमाणपत्रांसाठी मोठ्याप्रमाणावर अर्ज दाखल झालेले असल्याने महसूल विभागातील अधिकारी व संबधीत कर्मचारी तसेच आपले सरकार केंद्राचे संचालक यांच्यावरील कामाचा ताण वाढतो. सर्व्हर वरील ताण वाढल्याने प्रणालीचा वेग मंदावतो. त्यामुळे अधिकारी व संबधीत कर्मचारी यांना रात्र पाळी करून दाखल्यांचे कामकाज करावे लागते. एवढे सर्व करूनही काही विद्यार्थ्यांना वेळेवर दाखले मिळण्यास अडचण निर्माण होते. परिणामी त्यांच्या मनात प्रशासनाबद्दल नकारात्मक भावना निर्माण होते.

या सर्व बाबी लक्षात घेता विद्यार्थी, पालक यांची दाखले काढण्यासाठी होणारी धावपळ थांबली पाहिजे, मध्यस्थ व्यक्तीकडून विद्यार्थी, पालक यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबली पाहिजे, महसूल विभागातील अधिकारी व संबधीत कर्मचारी यांच्यावरील कामाचा ताण कमी होवून,गतिमान व लोकाभिमुख प्रशासनाची प्रचिती विद्यार्थी, पालक यांना आली पाहिजे या हेतूने जर उन्हाळी सुट्ट्यांच्या काळात शाळेत एकाच छताखाली मंडळ अधिकारी, मुख्याध्यापक, तलाठी, आपले सरकार केंद्र संचालक यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या दाखल्यांची नोंदणी व वितरण शिबिराचे आयोजन केले तर विद्यार्थ्यांना गाव पातळीवर, शालेय स्तरावर आवश्यक दाखले प्रवेश प्रक्रियेच्यापूर्वीच उपलब्ध होतील, या विचार प्रक्रीयेतून उन्हाळी सुट्टीत **"दाखल्यांची शाळा"** भरविण्याचे नियोजन व त्याप्रमाणे प्रत्यक्ष अंमलबजावणी खिरोदा प्र.यावल मंडळातील विविध शाळांमध्ये करण्यात आली.

# पूर्व तयारी

## १) पुर्व तयारी बैठका :-

शाळांच्या उन्हाळी सुट्टीत गाव स्तरावर,शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना दाखले मिळावेत यासाठी प्रशासकीय अधिकारी व यंत्रणांचा सक्रीय सहभाग व पाठबळ असणे आवश्यक आहे.त्यामुळे उपविभागीय अधिकारी फैजपूर,तहसीलदार रावेर यांच्या मार्गदर्शनानुसार संबधित शाळांचे मुख्याध्यापक,संबधित गावाचे तलाठी, सरपंच/ पदाधिकारी,कोतवाल,आपले सरकार केंद्र संचालक यांच्या बैठका घेऊन **"दाखल्यांची शाळा"** या संकल्पने मागची पार्श्वभूमी विशद करण्यात आली व जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र या शैक्षणिक प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची माहिती देऊन जबाबदारीचे वाटप करण्यात आले.






| क्र. | सहभागी घटक | वाटप करण्यात आलेली जबाबदारी |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | ➢ "दाखल्यांची शाळा" या शैक्षणिक दाखल्यांसाठी शिबीराची प्रचार व प्रसिद्धी करणे. |
| २ | तलाठी | ➢ "दाखल्यांची शाळा" या शैक्षणिक दाखल्यांसाठी शिबीराची प्रचार व प्रसिद्धी करणे.<br>➢ शिबीरा ठिकाणी उपस्थित राहून उत्पन्न अहवाल वितरण करणे.<br>➢ विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी मदत करणे. |
| ३ | शालेय प्रशासन व मुख्याध्यापक | ➢ जागा/सभागृह व फर्निचर उपलब्ध करून देणे.<br>➢ विद्यार्थी बैठक व्यवस्था करणे .<br>➢ मुख्याध्यापक यांनी राहून बोनाफाईड प्रमाणपत्र वितरण करणे. |
| ४ | कोतवाल | ➢ अर्ज वाटप करणे.प्रमाणपत्र नोंदणी करताना गोंधळ होऊ नये,शिस्त राहावी यासाठी टोकन वाटप करणे. |
| ५ | मंडळ अधिकारी **(समन्वयक)** | ➢ "दाखल्यांची शाळा" या उपक्रमाचे संपुर्ण नियोजन व पर्यवेक्षण करणे.<br>➢ अर्ज व कागदपत्र छाननी करणे.<br>➢ पोर्टल वर नोंदणी झालेल्या दाखल्यांना सक्षम अधिकारी यांची मान्यता मिळवणे.<br>➢ दाखले तयार झाल्यानंतर शिबिरातच वितरण करण्यासाठी नियोजन करणे.<br>➢ कागदपत्रांच्या अपूर्णतेमुळे ज्या विद्यार्थ्यांना दाखले मिळू शकले नाही त्याबाबत पाठपुरावा करून परिपूर्ण प्रस्ताव तयार करून घेणे व दाखले वितरण करणे. |
| ६ | आपले सरकार केंद्र संचालक | ➢ पोर्टल वर कागदपत्रे स्कॅन करून दाखला नोंदणी करणे व नोंदणी झाल्याचा पुरावा म्हणून पावती देणे. |

## २) गाव पातळीवर शिबीराबाबत प्रसिद्धी :-

जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र या शैक्षणिक दाखल्यांसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रे,शिबिराचे ठिकाण व वेळ यांची माहिती देणारे भित्तीपत्रक तयार करून तलाठी,कोतवाल यांच्या मार्फत गावातील विविध ठिकाणी दर्शनी भागात चिकटवण्यात आले. तसेच प्रसिद्धीसाठी पारंपरिक पद्धतीने गावागावांत **"दाखल्यांच्या शाळेबाबत"** दवंडीही देण्यात आली.











## ३) <u>सोशल मिडीयाच्या माध्यमातून शिबीराबाबत प्रसिध्दी :-</u>

सद्यस्थितीत सोशल मिडीयाचा वापर व समाजावरील प्रभाव लक्षात घेता व WhatsApp, Facebook इत्यादी माध्यमातून गावातील विविध ग्रुपवर जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र शैक्षणिक प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती, शिबिराचे ठिकाण व वेळ यांची माहिती देणारे पत्रक प्रसिद्ध करण्यात आले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

**मंडळ अधिकारी खिरोदा प्र.यावल ता.रावेर यांचे कार्यालय**

ग्रामपंचायत कार्यालयाजवळ,खिरोदा प्र.यावल ता.रावेर जि.जळगाव.पिन कोड – 425504

**"दाखल्यांची शाळा"**

**शैक्षणिक दाखले तयार करण्यासाठी खिरोदा प्र यावल येथे शिबीर !**

खिरोदा प्र यावल,रोझोदा,कळमोदा,सावखेडा बु,सावखेडा खुर्द,कोचुर बु,कोचुर खुर्द व बोरखेडा सीम गावातील सर्व पालक व विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, महसूल प्रशासनातर्फे शालेय विद्यार्थ्यांना गावपातळीवरच जातीचे प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र,राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र,अधिवास प्रमाणपत्र वितरीत करण्याच्या हेतूने <u>धनाजी नाना विद्यालय,खिरोदा प्र यावल येथे दिनांक 09.06.2023 रोजी सकाळी 9.00 वाजता</u> "<u>दाखल्यांची शाळा</u>"शिबीराचे आयोजन केले आहे.

सदर शिबीरात मंडळ अधिकारी,मुख्याध्यापक,तलाठी,आपले सरकार केंद्र चालक इत्यादी सर्व एकाच छताखाली उपस्थितीत राहणार आहेत.अधिक माहितीसाठी मंडळ अधिकारी,तलाठी,मुख्याध्यापक,आपले सरकार केंद्र चालक यांच्याशी संपर्क साधावा.

<u>शैक्षणिक दाखले काढण्यासाठी लागणारे कागदपत्रे</u>

| १) जातीचे प्रमाणपत्र | २) नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र |
|---|---|
| ➢ अर्ज<br>➢ स्वयंघोषणापत्र<br>➢ विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड<br>➢ वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला<br>➢ आजोबांचा शाळा सोडल्याचा दाखला अथवा जन्म नोंद ज्यावर जातीचा उल्लेख आहे. (सन १९६० पुर्वीचा पुरावा)<br>➢ आधार कार्ड | ➢ अर्ज<br>➢ स्वयंघोषणापत्र<br>➢ विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला<br>➢ विद्यार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र<br>➢ वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला<br>➢ तलाठी यांचा तीन वर्षाचा उत्पन्नाचा अहवाल किंवा तीन वर्षाचा पगार दाखला<br>➢ आधार कार्ड |
| **३) उत्पन्न प्रमाणपत्र** | **४)डोमेसाईल व नॅशनॅलीटी प्रमाणपत्र** |
| ➢ अर्ज<br>➢ तलाठी यांचा उत्पन्नाचा अहवाल<br>➢ आधार कार्ड<br>➢ रेशन कार्ड | ➢ अर्ज<br>➢ विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला/जन्म स्थळ लिहिलेले बोनाफाईड<br>➢ आधार कार्ड व रेशन कार्ड |

आपल्याला जे प्रमाणपत्र काढायचे आहे त्यासाठी आवश्यक लागणारे मूळ/ओरिजिनल कागदपत्रे व एक सेट झेरॉक्स सोबत घेऊन यावा.विहित नमुन्यातील अर्ज,तलाठी यांच्याकडील उत्पन्न अहवाल व धनाजी विद्यालयाच्या विद्यर्थ्यांना बोनाफाईड प्रमाणपत्र शिबीरा ठिकाणीच उपलब्ध करून दिले जाणार आहेत. तरी सदर शिबीराचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थी यांनी घ्यावा.

जे.डी.बंगाळे
मंडळ अधिकारी खिरोदा प्र यावल

# दाखल्यांची शाळा

वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार पुर्व तयारी करून शाळेनिहाय **“दाखल्यांची शाळा”** या शैक्षणिक दाखल्यांसाठी शिबीराचे आयोजन करण्यात आले.

- **प्रकाश विद्यालय व ज्युनियर कॉलेज, मोठे वाघोदे** येथे दिनांक ३१.०५.२०२३ रोजी

- **नुतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चिनावल** येथे दिनांक ०३.०६.२०२३ रोजी

- **धनाजी नाना विद्यालय, खिरोदा प्र यावल** येथे दिनांक ०९.०६.२०२३ रोजी उन्हाळी सुट्टीत **“दाखल्यांची शाळा”** भरविण्यात आली.



प्रकाश विद्यालय व ज्युनियर कॉलेज, मोठे वाघोदे



नुतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चिनावल




धनाजी नाना विद्यालय, खिरोदा प्र यावल

कामकाजात सुसूत्रता असावी व कामकाज परिणामकारकपणे व्हावे यासाठी शिबिराच्या ठिकाणी खालीलप्रमाणे कक्ष तयार करण्यात आले.

- **अर्ज व टोकन वितरण कक्ष.**
- **मदत व कागदपत्र तपासणी कक्ष.**
- **मुख्याध्यापक यांच्या मार्फत बोनाफाईड प्रमाणपत्र देण्यासाठी कक्ष.**
- **तलाठी यांचा उत्पन्न अहवाल देण्यासाठी कक्ष.**
- **पोर्टलवर अर्ज नोंदणी करण्यासाठी कक्ष.**

असे कक्ष तयार करून जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र,राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र,नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र दाखल्यांची नोंदणी करण्यात आली.



अर्ज व टोकन वितरण कक्ष



बोनाफाईड वितरण कक्ष



मदत व कागदपत्र तपासणी कक्ष



दाखले नोंदणी कक्ष

**"दाखल्यांची शाळा"** या उपक्रमात शालेय प्रशासन,मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना शिबीराच्या ठिकाणीच 290 बोनाफाईड प्रमाणपत्र,तलाठी यांनी 186 उत्पन्न अहवाल उपलब्ध करून दिले. तर आपले सरकार केंद्र संचालकामार्फत 680 दाखल्यांची नोंदणी करण्यात आली.

आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे, आपले सरकार केंद्र संचालकामार्फत दाखल्यांची पोर्टलवर नोंदणी करणे इत्यादी सर्व सुविधा **"दाखल्यांची शाळा"** या उपक्रमांतर्गत एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या.यासाठी विद्यार्थी,पालक यांच्याकडून शासकीय शुल्क स्विकारणेत येवून इतर सर्व सेवा नि:शुल्क देण्यात आल्या. **"दाखल्यांची शाळा"** या उपक्रमासाठी एकूण शासकीय खर्च 'शून्य' रुपये आला.



# "दाखल्यांची शाळा" या नाविन्यपूर्ण उपक्रमा अंतर्गत नोंदणी व वितरण झालेल्या दाखल्यांची संख्या

| अ. क्र. | दाखल्याचे नाव | शिबीरात नोंदणी व वितरण झालेल्या दाखल्यांची संख्या | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रकाश विद्यालय व ज्युनि. कॉलेज मोठे वाघोदे | नुतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिनावल | धनाजी नाना विद्यालय खिरोदा प्र यावल | |
| 1 | जातीचे प्रमाणपत्र | 47 | 44 | 68 | 159 |
| 2 | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | 12 | 18 | 15 | 45 |
| 3 | अधिवास प्रमाणपत्र | 72 | 50 | 96 | 218 |
| 4 | राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र | 68 | 41 | 08 | 117 |
| 5 | तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला | 52 | 27 | 60 | 139 |
| 6 | केंद्रीय जात प्रमाणपत्र | 0 | 02 | 0 | 02 |
| 7 | बोनाफाईड | 79 | 74 | 137 | 290 |
| 8 | तलाठी उत्पन्न अहवाल | 52 | 49 | 85 | 186 |
| | **एकूण** | 382 | 305 | 469 | 1156 |

**“दाखल्यांची शाळा”** शिबीरात प्रमाणपत्रांची नोंदणी झाल्या नंतर तहसील कार्यालय रावेर व उपविभागीय अधिकारी कार्यालय फैजपूर कार्यालयाकडुन पोर्टलवर कागदपत्रांची पडताळणी करून दाखल्यांना मान्यता देण्यात आली. व त्यानंतर विद्यार्थी यांना म. उपविभागीय अधिकारी, फैजपूर व तहसीलदार रावेर यांच्या हस्ते दाखले वितरण करण्यात आले.



**श्री. कैलास कडलग, उपविभागीय अधिकारी, फैजपूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण**



**श्री. बी. ए. कापसे, तहसिलदार रावेर, यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण**

# “दाखल्यांची शाळा” या नाविन्यपूर्ण उपक्रमाची फलनिष्पत्ती

## १) एकाच छताखाली सर्व दाखले उपलब्ध झाले :-

तलाठी यांनी 186 उत्पन्न अहवाल व मुख्याध्यापकांनी 290 बोनाफाईड प्रमाणपत्र असे एकुण 476 दाखले विद्यार्थ्यांना जागेवर उपलब्ध करून दिले. तर जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र इत्यादी मिळून 680 दाखल्यांची नोंदणी शिबिरात करण्यात आली. हे सर्व कामकाज एकाच छताखाली झाले.

## २) विद्यार्थी व पालक यांच्या वेळेची, श्रमाची व आर्थिक बचत :-

सर्वसाधारणपणे दाखले काढण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी अथवा मोठ्या गावाच्या ठिकाणी जावे लागते. तसेच एका पेक्षा जास्त फेऱ्यासुद्धा माराव्या लागतात. यात वेळ, श्रम आणि पैसे खर्ची पडतात. परंतु शालेय स्तरावर शिबीर आयोजित केल्याने व एकाच दिवशी सर्व कागदपत्रे उपलब्ध झाल्याने वेळेची, श्रमाची व आर्थिक बचत झाली.

# “दाखल्यांची शाळा” या नाविन्यपूर्ण उपक्रमाची फलनिष्पत्ती

## ३) शासकीय शुल्कात दाखले उपलब्ध :-

काही वेळा विद्यार्थी यांची निकड पाहून मध्यस्थाकडून दाखले काढून देण्यासाठी मोठ्याप्रमाणावर आर्थिक रक्कम घेतली जाते.यात महसूल विभागाची नाहक बदनामी होते व प्रशासनाची नकारात्मक प्रतिमा जनमानसात तयार होते. परंतु या उपक्रमात विद्यार्थी,पालक यांच्याकडून दाखल्यांसाठीचे शासकीय शुल्क स्विकारणेत येवून इतर सर्व सेवा नि:शुल्क देण्यात आल्या.

## ४) लोकाभिमुख प्रशासन :-

विद्यार्थी व पालक यांना कोणत्याही शासकीय कार्यालयात न जाता गाव पातळीवरच दाखले उपलब्ध झाले. प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी त्यांच्या पर्यंत पोहचले व यानिमित्ताने खिरोदा प्र.यावल महसूल मंडळात विद्यार्थी पालक यांना लोकाभिमुख प्रशासनाची प्रचिती आली.

# “दाखल्यांची शाळा” या नाविन्यपूर्ण उपक्रमाची फलनिष्पत्ती

## ५) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वृद्धी :-

दाखले काढण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थी स्वत: सहभागी झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांसाठी आवश्यक असणारे कागदपत्रे व ते काढण्यासाठीची प्रक्रिया याची माहिती झाली. त्यामुळे भविष्यात त्यांना इतर दाखले काढण्याची आवश्यकता भासल्यास ते स्वत: सर्व प्रक्रियेला विना संकोच, आत्मविश्वासपुर्वक सामोरे जातील.

## ६) विद्यार्थिनी व महिला पालकांचा लक्षणीय सहभाग :-

जेव्हा दाखले काढण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी अथवा मोठ्या गावाच्या ठिकाणी जावे लागते तेव्हा साधारणपणे विद्यार्थिनींना/मुलींना एकटे पाठवले जात नाही. परंतु **“दाखल्यांची शाळा”** अंतर्गत शिबीर हे गाव पातळीवर-शालेय स्तरावर घेण्यात आले. त्यामुळे विद्यार्थीनींना सहज सहभागी होता आले. तसेच महिला पालकांचा सहभागही लक्षणीय दिसून आला.

# “दाखल्यांची शाळा” या नाविन्यपूर्ण  उपक्रमाची फलनिष्पत्ती

## ७) विद्यार्थी-पालक व प्रशासन यांच्यात सुसंवाद निर्माण झाला :-

तहसिल कार्यालय, तलाठी कार्यालय इत्यादी कार्यालयांशी विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संबंध अथवा संपर्क येत नाही. परंतू या शिबीराच्या निमित्ताने महसूल प्रशासनातील घटक जसे की,महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल यांच्याशी विद्यार्थ्यांचा थेट संपर्क आला व सुसंवाद निर्माण झाला.

## ८) विद्यार्थी यांच्या उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग झाला :-

पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची प्रमाणपत्रे शिबीरात नोंदणी झाल्याने विद्यार्थ्यांची पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतांना दाखल्यांसाठी होणारी धावपळ टळली व  उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग झाला.

# “दाखल्यांची शाळा” या नाविन्यपूर्ण उपक्रमाची फलनिष्पत्ती

## ९) आर्थिक भाराशिवाय शिबीराचे आयोजन :-

**“दाखल्यांची शाळा”** या उपक्रमासाठी एकूण शासकीय खर्च ‘शून्य’ रुपये आला.त्यामुळे महसूल प्रशासनाला कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार सोसावा लागला नाही.

## १०) महसूल प्रशासन, अधिकारी व कर्मचारी यांची प्रतिमा उंचावण्यास मदत :-

महसूल प्रशासन विविध प्रकारच्या लोकाभिमुख योजना/उपक्रम राबवत असते. त्याच प्रकारचा हा एक नाविन्यपुर्ण उपक्रम होता. विद्यार्थ्यांना गावपातळीवर दाखले नोंदणी झाल्याने वेळ, श्रम व आर्थिक बचत झाल्याने, सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने विद्यार्थी व पालक यांनी समाधान व्यक्त केले व महसूल प्रशासन, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले.

यातून महसूल प्रशासनाबद्दल व प्रशासनातील अधिकारी व कर्मचारींबद्दल एक सकारात्मक भावना विद्यार्थी व पालकांच्या मनात निर्माण होऊन महसूल प्रशासन व कर्मचारी यांची प्रतिमा उंचावण्यास मदत झाली.

# “दाखल्यांची शाळा” उपक्रमाचे प्रसार माध्यमांत उमटलेले प्रतिबिंब

पुण्य प्रताप

सोमवार दि.१२ जून २०२३

२

## शासन आपल्या दारी अभियानांतर्गत शिबीरात विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या ४७१ दाखल्यांची नोंदणी.. खिरोदा प्र यावल येथील धनाजी नाना विद्यालयात सुट्टीत भरली दाखल्यांची शाळा

सावदा– सावखेडा तालुका रावेर शासन आपल्या दारी अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना गावपातळीवरच जातीचे प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र,राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र,अधिवास प्रमाणपत्र वितरीत करण्याच्या हेतूने उपविभागीय अधिकारी फैजपूर व तहसिलदार रावेर यांच्या मार्गदर्शनाखाली धनाजी नाना विद्यालय खिरोदा प्र यावल ता.रावेर येथे दिनांक ९ रोजी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबीरास पालक आणि विद्यार्थी यांनी अत्यंत चांगला प्रतिसाद दिला आणि शिबीर खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यास हातभार लावला.

शिबीरात ४७१ दाखल्यांची नोंदणी झाली.त्यात जातीचे प्रमाणपत्र ६८, तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला ६०,नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र १५, बोनाफाईड १३७, अधिवास प्रमाणपत्र ९६, तलाठी उत्पन्न अहवाल८५, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र ०८ एकूण :- ४७१ यातील १३७ बोनाफाईड व ८५ तलाठी उत्पन्न अहवाल असे एकूण २२२ दाखले शिबीरातच वितरीत करण्यात आले.व उर्वरित २४९ दाखले महाऑनलाईन या शासकीय पोर्टल नोंदणी करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका मनिषा महाजन यांनी विद्यार्थ्यांना तात्काळ बोनाफाईड दाखले उपलब्ध करून दिले.तसेच तलाठी खिरोदा प्र यावल अंजुम तडवी, तलाठी रोझोदा लीना राणे,तलाठी सावखेडा बु निलेश चौधरी व तलाठी कोचुर.प्रशांत जावळे यांनी विध्यार्थ्यांना तात्काळ उत्पन्न प्रमाणपत्र व नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारा उत्पनाचा अहवाल जागेवरच उपलब्ध करून दिले.आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक पंकज पाटील,महेंद्र कोळी.संदीप पाटील,निलेश नेमाडे यांनी सर्व सेटअप शाळेच्या सभागृहात लाऊन महा ऑनलाइन या शासकीय पोर्टल वर सर्व दाखल्यांची नोंदणी केली.यामुळे एकाच छताखाली विध्यार्थी व पालकांना सर्व सुविधा उपलब्ध झाल्या.

मंडळ अधिकारी खिरोदा प्र यावल जे डी बंगाळे यांनी पुढाकार घेउन मंडळातील विविध ठिकाणी दाखल्यांची शाळा हा स्त्युत उपक्रम राबवल्याने पालक व विद्यार्थी यांच्या श्रमाची व पैश्याची बचत झाली. जवळपास एक हजार दाखल्यांचे काम झाले. त्यामुळे विद्यार्थी व पालक वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे.

शिबीर यशस्वी होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा महाजन , संचालक .टी.जी.बोरोले,.हडपे,एस.पी.चौधरी ,वाघ सर,कुर्बान तडवी सर व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.खिरोदा प्र यावल ग्रामपंचायतच्या सरपंच मनिषा चौधरी यांनी विद्यार्थ्यांना दाखले भरण्यास मदत करून मार्गदर्शन केले. कोतवाल शांताराम कोळी,फिरोज तडवी तसेच ग्रामपंचायत खिरोदा,कळमोदा,रोझोदा,कोचुर येथील कर्मचारी यांनीही मेहनत घेतली. खिरोदा येथील महेंद्र चौधरी,मनोहर चौधरी यांनी स्वयंप्रेरणेने सहकार्य केले. शिबीरात उपस्थितीत सर्व विध्यार्थी व पालकांनी शिस्तीचे पालन केले. तसेच शालेय प्रशासन, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तलाठी खिरोदा प्र यावल, रोझोदा, सावखेडा बु,कोचुर बु,ग्रामपंचायत खिरोदा, कळमोदा, रोझोदा, कोचुर, सावखेडा व शिबीरास नागरिक, आपले सरकार केंद्राचे संचालक यांचेही सहकार्य लाभले



**शासन आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत धनाजी नाना विद्यालया भरवलेल्या शिबिरात बोलताना खिरोदा मंडळाधिकारी जे.डी. बंगाळे पालक , विध्यार्थी व इतर..**

# “दाखल्यांची शाळा” उपक्रमाचे प्रसार माध्यमांत उमटलेले प्रतिबिंब

दैनिक **महाराष्ट्र सारथी**

शोषित, पीडित, दलित, वंचितांचा बुलंद आवाज

## शासन आपल्या दारी अभियानांतर्गत शिबीरात विद्यार्थ्यांसा
## आवश्यक असणाऱ्या ४७१ दाखल्यांची नोंदणी

### खिरोदा प्र यावल येथील धनाजी नाना विद्यालयात सुट्टीत भरली दाखल्यांची शाळा

**दै.महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**सावखेडा । प्रतिनिधी :**

तालुका रावेर -शासन आपल्या दारी अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना गाव पातळी वरच जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र वितरीत करण्याच्या हेतूने उपविभागीय अधिकारी फैजपूर व तहसिलदार रावेर यांच्या मार्गदर्शनाखाली धनाजी नाना विद्यालय खिरोदा प्र यावल ता.रावेर येथे दिनांक ९ रोजी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबीरास पालक आणि विद्यार्थी यांनी अत्यंत चांगला प्रतिसाद दिला आणि शिबीर खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यास हातभार लावला. शिबीरात४७१ दाखल्यांची नोंदणी झाली.त्यात जातीचे प्रमाणपत्र ६८, तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला६०, नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र १५, बोनाफाईड १३७, अधिवास प्रमाणपत्र ९६,तलाठी उत्पन्न अहवाल ८५,राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र ०८ एकूण :- ४७१ यातील १३७ बोनाफाईड व ८५ तलाठी उत्पन्न अहवाल असे एकूण २२२ दाखले शिबीरातच वितरीत करण्यात आले.व उर्वरित २४९ दाखले महाऑनलाईन या शासकीय पोर्टल नोंदणी करण्यात आले.



शासन आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत धनाजी नाना विद्यालया भरवलेल्या शिबिरात बोलताना खिरोदा मंडळाधिकारी जे.डी. बंगाळे पालक , विध्यार्थी व इतर..

यावेळी मुख्याध्यापिका मनिषा महाजन यांनी विद्यार्थ्यांना तात्काळ बोनाफाईड दाखले उपलब्ध करून दिले.तसेच तलाठी खिरोदा प्र यावल अंजुम तडवी, तलाठी रोझोदा लीना राणे, तलाठी सावखेडा बु निलेश चौधरी व तलाठी कोचुर.प्रशांत जावळे यांनी विध्यार्थ्यांना तात्काळ उत्पन्न प्रमाणपत्र व नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारा उत्पनाचा अहवाल जागेवरच उपलब्ध करून दिले.आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक पंकज पाटील, महेंद्र कोळी.संदीप पाटील, निलेश नेमाडे यांनी सर्व सेटअप शाळेच्या सभागृहात लाऊन महा ऑनलाइन या शासकीय पोर्टल वर सर्व दाखल्यांची नोंदणी केली.यामुळे एकाच छताखाली विध्यार्थी व पालकांना सर्व सुविधा उपलब्ध झाल्या. मंडळ अधिकारी खिरोदा प्र यावल जे डी बंगाळे यांनी पुढाकार घेउन मंडळातील विविध ठिकाणी दाखल्यांची शाळा हा स्त्युत उपक्रम राबवल्याने पालक व विद्यार्थी यांच्या श्रमाची व पैश्याची बचत झाली. जवळपास एक हजार दाखल्यांचे काम झाले.त्यामुळे विद्यार्थी व पालक वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे.

शिबीर यशस्वी होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा महाजन, संचालकटी. जी. बोरोले,हडपे,एस.पी.चौधरी, वाघ सर, कुर्बान तडवी सर व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.खिरोदा प्र यावल ग्रामपंचायतच्या सरपंच मनिषा चौधरी यांनी विद्यार्थ्यांना दाखले भरण्यास मदत करून मार्गदर्शन केले.कोतवाल शांताराम कोळी,फिरोज तडवी तसेच ग्रामपंचायत खिरोदा, कळमोदा, रोझोदा,व येथील कर्मचारी यांनीही मे घेतली. खिरोदा येथील चौधरी, मनोहर चौधरी स्वयं प्रेरणेने सहकार्य शिबीरात उपस्थितीत विध्यार्थी व पालकांनी शि पालन केले.

तसेच शालेय प्रश मुख्याध्यापक,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,त खिरोदा प्र. यावल, रो सावखेडा बु,कोचुर बु. पंचायत खिरोदा, कळ रोझोदा, कोचुर,सावखे शिबीरास नागरिक सरकार केंद्राचे सं सहकार्य ला

---

**दिव्य मराठी**

# भुसावळ 05-06-2023

**प्रतिनिधि. कमलाकर माळी**

**उपक्रमाने दिलासा** • रावेर तहसील कार्यालयाचा विद्यार्थ्यांसाठी पुढाकार

## वाघोदा प्रकाश विद्यालयात आयोजित शिबिरामध्ये विविध दाखल्यांचे वाटप

प्रतिनिधी | मोठे वाघोदे

वाघोदे बुद्रुक येथील प्रकाश विद्यालयात विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. शासन आपल्या दारी योजनेतून विविध दाखले मिळण्यासाठीचा कॅम्प घेण्यात आला. त्यासाठी रावेर तहसील कार्यालयाने पुढाकार घेतला.

शिबिरात विद्यार्थ्यांना जातीचे, अधिवास दाखले व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, उत्पन्नाचे दाखले व इतर कागदपत्र काढण्यासाठी प्रक्रिया करावी लागली. त्यासाठी एरवी तहसील कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात. मात्र, ही सेवा शाळेतील शिबिरात मिळाली. त्यासाठी तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी जे.डी.बंगाळे, तलाठी प्रशांत जावळे, रावेर महसूल सहाय्यक प्रवीण पाटील, आपले सेवा केंद्राचे संचालक स्वप्निल पवार उपस्थित होते. विद्यार्थ्यांना विविध दाखले देण्यासह गावातील संजय गांधी निराधार अनुदान व वृद्धापकाळ योजनेच्या लाभार्थींचे उत्पन्न व हयातीचे दाखले भरण्यात आले. विद्यार्थ्यांचे ११८, निराधार अनुदान योजनेसाठी ७४ जणांना उत्पन्न दाखले देण्यात आले.



शासकीय दाखले काढण्यासाठी झालेली विद्यार्थ्यांची गर्दी. तयार झाल्यानंतर दाखल्यांचे वाटप केले जाणार आहे.

## चिनावलच्या शिबिरात २३७ दाखले नोंद

**चिनावल** | शासन आपल्या दारी अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना विविध गरजेचे दाखले उपलब्ध व्हावे यासाठी महसूल विभागाने चिनावल येथील नूतन माध्यमिक विद्यालयात शिबिर आयोजित केले होते. त्यात ४९ तलाठी उत्पन्न दाखले, ४४ जातीचे, १८ नॉन क्रिमिलेअर, २७ तहसीलदारांचे उत्पन्नाचे दाखले, ५० अधिवास, ४९ राष्ट्रीयत्व दाखल्यांसाठी नोंदणी झाली. दाखले तयार झाल्यानंतर त्यांचे वाटप होईल.

हे शिबिर एकाच छताखाली घेतल्याने विद्यार्थी व पालकांचा दाखले काढताना होणारा त्रास वाचला. संस्थाध्यक्ष श्रीकांत सरोदे, चेअरमन विनायक महाजन, मुख्याध्यापक एच.आर.ठाकरे, पर्यवेक्षक पी.एम. जावळे, खिरोदा मंडलाधिकारी जे.डी.बंगाळे, तलाठी लीना राणे, कोतवाल फिरोज तडवी यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले. आपले सेवा केंद्र चालक नीलेश नेमाडे, कपिल कोल्हे, किरण नेमाडे, शिक्षक पी.एस.वारके, एम.बी.पाटील रोशन होले यांनी सहकार्य गरजूंना यामुळे दिलासा मिळा

# “दाखल्यांची शाळा” उपक्रमाचे प्रसार माध्यमांत उमटलेले प्रतिबिंब

लोकमत



चिनावल येथे शासकीय दाखल्यांसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी विद्यार्थी व पालकांची गर्दी.

Hello Bhusaval
Page No. 4 Jun 06, 2023
Powered by: erelego.com

लोकमत



वाघोदे प्रकाश विद्यालयात विविध दाखल्यांचे वाटप शिबिरात तहसील कार्यालयातील उपस्थित कर्मचारी.

Hello Bhusaval
Page No. 4 Jun 01, 2023
Powered by: erelego.com

# “दाखल्यांची शाळा” उपक्रमाचे प्रसार माध्यमांत उमटलेले प्रतिबिंब

शिल्पकार विकासाचा...

**देशदूत**

रविवार,दि.११ जून २०२३

**सावखेडा, ता.रावेर । वार्ताहर**

दि. ९ रोजी खिरोदा प्र यावल येथील धनाजी नाना विद्यालयात सुट्टीत भरली दाखल्यांची शाळा 'शासन आपल्या दारी' अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना गावपातळीवरच जातीचे प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र,राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र,अधिवास प्रमाणपत्र वितरीत करण्याच्या हेतूने मा.उपविभागीय अधिकारी सो फैजपूर व मा.तहसिलदार सो रावेर यांच्या मार्गदर्शनाखाली धनाजी नाना विद्यालय खिरोदा प्र यावल ता.रावेर येथे आज दिनांक ०९ रोजी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबीरास पालक आणि विद्यार्थी यांनी अत्यंत चांगला प्रतिसाद दिला आणि शिबीर खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यास हातभार लावला.

शिबीरात नोंदणी झालेल्या दाखल्यांची संख्या अ.क्र, दाखल्याचे नाव, संख्या -१)जातीचे प्रमाणपत्र ६८५ तहसिलदार सो यांचा उत्पन्नाचा दाखला ६०, २) नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र१५६बोनाफाईड १३७, ३) अधिवास प्रमाणपत्र९६७तलाठी उत्पन्न अहवाल ८५, ४) राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र ०८ एकूण : ४७१ यातील १३७ बोनाफाईड व ८५ तलाठी उत्पन्न अहवाल असे एकूण २२२ दाखले शिबीरातच वितरीत करण्यात आले. व उर्वरित २४९दाखले महा ऑनलाईन या शासकीय पोर्टल नोंदणी करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा महाजन मॅडम यांनी विद्यार्थ्यांना तात्काळ बोनाफाईड दाखले उपलब्ध करून दिले.तसेच तलाठी खिरोदा प्र यावल श्रीमती अंजुम तडवी, तलाठी रोझोदा श्रीमती लीना राणे,तलाठी सावखेडा बु .निलेश चौधरी व तलाठी कोचुर ,प्रशांत जावळे यांनी विध्यार्थ्यांना तात्काळ उत्पन्न प्रमाणपत्र व नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारा उत्पनाचा अहवाल जागेवरच उपलब्ध करून दिले.आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक महेंद्र कोळी, श्री पंकज ,संदीप पाटील,निलेश नेमाडे यांनी सर्व सेटअप शाळेच्या सभागृहात महा ऑनलाईन या शासकीय पोर्टल वर सर्व दाखल्यांची नोंदणी केली.यामुळे एकाच छताखाली विध्यार्थी व पालकांना सर्व सुविधा उपलब्ध झाल्या. ह्या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे गाव पातळीवर शिबीर असल्याने मुलींमधे दाखले काढण्यासाठी उत्साह दिसून आला.विद्यार्थ्यांनी स्वत: कागदपत्रे हाताळल्याने त्यांनानी कागदपत्रे व दाखल्यांकी ओळख झाली.

शिबीर यशस्वी होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा महाजन मॅडम, संचालक टी. जी.बोरोले सर,श्री.हडपे,एस.पी.चौधरी सर,वाघ सर,कुर्बान तडवी सर व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.खिरोदा प्र यावल ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. मनिषा चौधरी यांनी विद्यार्थ्यांना दाखले भरण्यास मदत करून मार्गदर्शन केले. कोतवाल शांताराम कोळी,.फिरोज तडवी तसेच ग्रामपंचायत खिरोदा ,कळमोदा,रोझोदा,कोचुर येथील कर्मचारी यांनीही मेहनत घेतली.




छायाचित्रांमध्ये नोंदणी प्रमाणपत्र देताना मंडल अधिकारी जे.डी..बंगाळे सरपंच मनीषा चौधरी पालक वर्ग व विद्याथ. (छाया - संतोष नवले)

खिरोदा येथील महेंद्र चौधरी,मनोहर चौधरी यांनी स्वयंप्रेरणेने सहकार्य केले.शिबीरात उपस्थितीत सर्व विध्यार्थी व पालकांनी शिस्तीचे पालन केले. त्यामुळे त्यांचे मनापासून धन्यवाद.तसेच शालेय प्रशासन, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,तलाठी खिरोदा प्र यावल, रोझोदा, सावखेडा खुर्द बुद्रुक, कोचुर बु,ग्रामपंचायत खिरोदा, कळमोदा, शिबीरास सहकार्य करणारे नागरिक, आपले सरकार केंद्राचे संचालक व सोशल मिडीयाच्या माध्यमातून शिबीराचा प्रचार प्रसिद्धी करणारे नागरिक केली याप्रसंगी जे.डी.बंगाळे मंडळ अधिकारी खिरोदा प्र यावल यांनी नागरिकांचे आभार मानले.

दाखल्यांची शाळा- हा उपक्रम पूर्ण मंडळात राबविण्यासाठी मंडळ अधिकारी श्री.जे.डी.बंगाळे यांनी पुढाकार घेतला.यामुळे खऱ्या अर्थाने प्रशासन विद्यार्थ्यांपर्यंत पोहचले.यामुळे नागरिकांमधे समाधान व्यक्त केले जात आहे.

# “दाखल्यांची शाळा” उपक्रमाच्या निमित्ताने ...

शाळा,महाविद्यालय या ठिकाणी प्रवेश घेणे,शिष्यवृत्तीचा लाभ मिळवणेअथवा सरकारी नोकरी साठी अर्ज दाखल करणे यासाठी जातीचे प्रमाणपत्र,अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र दाखल्यांची आवश्यकता असते. परंतु शालेय जीवनात या दाखल्या बाबत पुरेशी माहिती विद्यार्थ्यांना नसते व त्यामुळे जेव्हा शाळा,महाविद्यालय यांच्याकडून प्रवेशासाठी अथवा शिष्यवृत्तीसाठी या दाखल्यांची मागणी करण्यात येते तेव्हा विद्यार्थी व पालक यांची धावपळ सुरु होते.

त्यामध्ये प्रामुख्याने जातीचे जुने पुरावे शोधण्यापासून ते अर्ज दाखल करण्यापर्यंतच्या सर्व बाबींचा समावेश आहे.यात काही वेळा आर्थिक भुर्दंड,शारिरीक,मानसिक त्रास सहन करावा लागतो.असा सर्वसामान्य अनुभव आहे. त्यामुळे शालेय स्तरावरच दाखले नोंदणीचे शिबीर आयोजित करून दाखल्यांचे वितरण करण्यासाठी उपविभागीय अधिकारी फैजपूर,तहसीलदार रावेर,अपर तहसीलदार रावेर यांच्या मार्गदर्शनाखाली खिरोदा प्र. यावल मंडळातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये उन्हाळी सुट्टीत **“दाखल्यांची शाळा”** हा उपक्रम राबविण्यात आला.

**“दाखल्यांची शाळा” हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे हेतू :-**

- **दाखले काढण्यासाठी विद्यार्थी व पालक यांची होणारी धावपळ थांबवणे.**
- **एका छताखाली सर्व दाखले उपलब्ध करून देणे.**
- **मध्यस्थ व्यक्तीकडून विद्यार्थी व पालक यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवणे.**
- **विद्यार्थी – पालक यांच्या श्रमाची व पैश्याची बचत करणे.**
- **लोकाभिमुख प्रशासन राबवणे व रुजवणे.**

वरील हेतूने **प्रकाश विद्यालय व ज्युनियर कॉलेज मोठे वाघोदे** येथे दिनांक 31.05.2023 रोजी, **नुतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिनावल** येथे दिनांक 03.06.2023 रोजी व **धनाजी नाना विद्यालय खिरोदा प्र यावल** येथे दिनांक 09.06.2023 रोजी उन्हाळी सुट्टीत **“दाखल्यांची शाळा”** या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमातून तलाठी यांनी उत्पन्न अहवाल व बोनाफाईड प्रमाणपत्र मिळून 476 दाखले विद्यार्थ्यांना जागेवर उपलब्ध करून देण्यात आले तर जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र,उत्पन्न प्रमाणपत्र इत्यादी मिळून 680 दाखल्यांची नोंदणी करण्यात आली. व विद्यार्थ्यांना दाखले वितरण करण्यात आले.शासकीय सेवांचा लाभ विद्यार्थ्यांना गाव पातळीवर एकाच छताखाली मिळाला.

शासकीय सेवेत मंडळ अधिकारी या पदावर असल्यामुळे, महसूल प्रशासनातील घटक असल्याने मला या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्याची संधी मिळाली. मी प्रथमत: महाराष्ट्र शासनाचा आभारी आहे. सातत्याने लोकाभिमुख व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी आग्रही असणारे मा.विभागीय आयुक्त नाशिक,मा.जिल्हाधिकारी जळगाव यांच्या पाठबळ व प्रेरणेमुळे **"दाखल्यांची शाळा"** या उपक्रमाचे आयोजन यशस्वी होवू शकले.मा.उपविभागीय अधिकारी फैजपूर,मा.तहसीलदार रावेर,मा.अपर तहसीलदार रावेर,मा.निवासी नायब तहसीलदार रावेर यांचे विशेष सहकार्य या उपक्रमासाठी लाभले.

या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनातील घटकाप्रमाणेच शालेय प्रशासनाचे सहकार्य व सहभाग असणे आवश्यक होते. प्रकाश विद्यालय व ज्युनियर कॉलेज मोठे वाघोदे,नुतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिनावल व धनाजी नाना विद्यालय खिरोदा प्र.यावल या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकानी व शालेय प्रशासनाने उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

गाव पातळीवरील तलाठी,कोतवाल,ग्रामपंचायत यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी मोठ्याप्रमाणावर प्रचार व प्रसिद्धी केली.प्रत्यक्ष उपक्रमाच्या दिवशी विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास मदत करणे,मार्गदर्शन करणे इत्यादी कामकाज पार पाडले.

आपले सरकार केंद्राचे संचालक यांनी त्यांचा सर्व संच (संगणक,प्रिंटर,स्कॅनर) शिबिराच्या ठिकाणी आणून दाखल्यांचे नोंदणी केली आणि आपले कर्तव्य चोखपणे पार पाडले.फैजदारी संकलनाचे महसूल सहाय्यक,अव्वल कारकून यांचेही मोलाचे सहकार्य या उपक्रमासाठी मिळाले.

वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शन व सहकार्य , मुख्याध्यापक, शालेय प्रशासन, तलाठी, ग्रामपंचायत, कोतवाल, आपले सरकार केंद्राचे संचालक इत्यादी घटकांचे सहकार्य व समन्वय यातूनच विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या दाखल्यांची नोंदणी करण्यात येऊन 1156 दाखल्यांचे वितरण करण्यात आले.व **"दाखल्यांची शाळा"** हा नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वी होवू शकला.धन्यवाद...!

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

**जे. डी. बंगाळे**
**मंडळ अधिकारी खिरोदा प्र.यावल**

सर्वांचे मनापासून

# धन्यवाद



**मंडळ अधिकारी खिरोदा प्र.यावल**
**ता.रावेर, जिल्हा जळगांव**